# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 02/09/2020 (बुधवार)
(दुपार)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर मौजा भिवापुर पारवे पेट्रोल पंप जवळ येथे दिनांक 02/09/2020 चे 09.30 वा. दरम्यान भिवापुर पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन भिवापुर पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच. – 31/ सी वयु – 0817 क्रमांकाच्या ट्रकला थांबवुन तपासणी केली असता आरोपी नामे– शाबीर दाउत अली, वय 34 वर्ष, रा. यशोधरा नगर, कामठी, नागपूर याच्या ताब्यातुन एकुण 25 जनावरे कि. 2,50,000/–रू. निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आल. वाहनासह एकुण किंमती 22,50,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. गणेश भुरे, पो.स्टे. भिवापुर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ)(9) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, सहकलम 109 भादवी तसेच कलम 83/177 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक श्री. उमेश झिंगरे हे करीत आहे.





# रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. उमरेड :– दि. 01/09/2020 रोजी पो.स्टे. उमरेड पोलिस स्टॉफ हा पो. स्टे. परिसरात पेट्रालिंग करीत असतांना त्यांना मुखबिरद्वारे खबर मिळाली की, काही इसम अवैधरित्या रेतीची वाहतुक करीत आहेत. अशा मिळालेल्या खबरे वरून पो. स्टे. उमरेड येथे रेती चोरी बाबत दोन केसेस करण्यात आल्या. पहिल्या प्रकरणात अंतर्गत 01 किमी अंतरावर मौजा गिरड रोड निसर्ग बार येथे दिनांक 01/09/2020 चे 00.05 वा. ते 00.45 वा. दरम्यान एमएच– 40/बीजी– 5834 क्रमांकाचा टिप्परचा चालक व मालक आरोपी नामे– रोशन दिलीप कानतोडे, वय 28 वर्ष, रा. मांगली ता. उमरेड याने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 05 ब्रास गौण खनिज रेती किं. 15,000/– रू. भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 20,15,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा तारूदत्ता बोरसरे 9764118811 हे करीत आहे.

तर दुसऱ्या प्रकरणात अंतर्गत 01 किमी अंतरावर मौजा गिरड रोड निसर्ग बार येथे दिनांक 01/09/2020 चे 01.10 वा. ते 01.50 वा. दरम्यान एमएच– 40/बीजी– 0898 क्रमांकाचा टिप्परचा चालक व मालक आरोपी नामे– राकेश बंडुजी भुरे, वय 34 वर्ष, रा. मांगली ता. उमरेड याने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 05 ब्रास गौण खनिज रेती किं. 15,000/– रू. भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 20,15,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा तारूदत्ता बोरसरे 9764118811 हे करीत आहे.

दोन्ही प्रकरणात एकुण 10 ब्रास रेती व दोन वाहनासह असा एकुण 40,30,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पो.स्टे. अरोली येथे आरोपीतांविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

. सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. विलास काळे, पोहवा तारूदत्ता बोरसरे, ना.पो.शि. राहुल धोंडे, पोशि. आाशिष खराबे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर